# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

### ठाणे व पालघर जिल्ह्यातील तानसा व वैतरणा धरणात पाण्याची पातळी वाढून धोका निर्माण झाल्याबाबत

**(१) ८४८ (१८-०३-२०२०) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणात धरणातील पाणी धोक्याची पातळी ओलांडत असल्यामुळे तानसा आणि वैतरणा धरणांच्या शेजारी असलेल्या पालघर आणि ठाणे जिल्ह्यातल्या सुमारे ७५ गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आल्याचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तानसा व वैतरणा धरणातील पाण्याच्या पातळीमुळे वाढत असलेला धोका टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-१२-२०२१) :** (१) पावसाळ्यात धरणांची पूर्ण संचय पातळी येण्याअगोदर ठाणे व पालघर जिल्हाधिकारी यांचे आपत्कालीन व्यवस्थापन कक्ष, स्थानिक पोलीस स्टेशन, तहसिलदार (शहापूर, भिवंडी, मोखाडा) व पोलीस अधीक्षक (ठाणे, पालघर) यांना अवगत करण्यात येते.

तथापि, दिनांक १६/१०/२०१९ रोजी वा त्यासुमारास बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कोणत्याही प्रकारे सतर्कतेचा इशारा देण्यात आलेला नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) तानसा व मध्य वैतरणा धरणातील पाण्याच्या पातळीमुळे वाढत असलेला धोका टाळण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- तानसा, मोडकसागर व मध्य वैतरणा धरणांची पाण्याची पातळी २४ तास निरीक्षणाखाली ठेवण्यात येते.
- तानसा व वैतरणा येथील नियंत्रण कक्षात धरणातील पाण्याच्या पातळीवर अहोरात्र लक्ष ठेवण्यात येते.
- तानसा व वैतरणा धरणांत पाण्याची पूर्ण संचय पातळी पोहोचल्यावर धरणांची स्वयंचलित पूरनियंत्रण द्वारे उघडतात. तसेच धरणात पाण्याची पातळी नियंत्रणात राखण्यासाठी विद्युतचलित पुरनियंत्रण द्वारेही उघडण्यात येतात.
- मोडकसागर व तानसा धरणाची पातळी वाढत असल्याने तानसा व वैतरणा धरणाखालील व नदीच्या आजूबाजूच्या परिसरातील रहिवाशांना पुराची कल्पना देऊन सावध राहण्यासाठी संबंधितांना दिनांक १५/०७/२०१९ रोजी पत्राद्वारे कळविण्यात आले होते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना जिल्हा क्रीडा संकुलमध्ये दर्जेदार सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२) २९२८ (२९-०५-२०२०) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३९ ला दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हा क्रीडा संकुलाकरीता सन २००९ मध्ये कोट्यवधी रुपये खर्च करुनही क्रीडा संकुलातील क्रीडांगणे, इमारती, वसतिगृहे यांची कामे अपूर्णावस्थेत असून क्रीडा संकुलात दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जालना जिल्हा क्रीडा संकुलातील विविध क्रीडांगणे अंतर्गत रस्त्यासह इतर विकास कामांसाठी सन २०१८-२०१९ मध्ये रुपये २.९० कोटी निधी मंजूर होऊनही सदरहू निधी अखर्चित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जिल्हा क्रीडा संकुलाकरीता सन २०१८-२०१९ मध्ये वितरीत केलेल्या रुपये २८२.५० लक्ष निधीतून करावयाच्या बहुउद्देशिय हॉल व अन्य कामांसाठी वास्तुविशारदाच्या नियुक्तीसाठी सुरु करण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जालना जिल्हा क्रीडा संकुलाच्या विकास कामांकरीता असलेला निधी अखर्चित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन क्रीडा संकुलाची विकास कामे पूर्ण करुन क्रीडा संकुलात दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (१६-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे. सदर क्रीडा संकुलासाठी रुपये ८००.०० लक्ष निधी टप्प्याटप्प्याने मंजूर केला असून त्यापैकी रुपये २८२.५० लक्ष इतका निधी दिनांक २१/०३/२०१८ रोजी वितरीत केला आहे.
(३) व (४) सदर क्रीडा संकुलासाठी वितरीत केलेल्या रुपये २८२.५० लक्ष निधीतून करावयाच्या कामांसाठी वास्तुविशारदाच्या नियुक्तीबाबत ई-निविदा प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण झाली आहे. यानुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांना वेतनेतर अनुदान देणेबाबत

**(३) ३९१३ (१७-०७-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.किशोर दराडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ रोजीच्या शासन निर्णयानुसार देण्यात येणारे वेतनेतर अनुदान सन २००४-२००५ पासून बंद केले होते, परंतु पुनश्च: वेतनेतर अनुदान सुरू करण्यासाठी सन २००८ मध्ये गठीत केलेल्या मंत्रिमंडळ समितीच्या शिफारशीनुसार दिनांक ३१/१०/२०१२ रोजी वेतनेतर अनुदान सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार दिनांक १९ जानेवारी, २०१३ रोजी शालेय शिक्षण विभागातर्फे राज्यातील मान्यता प्राप्त अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना ४ टक्के वेतनेतर अनुदान देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासन निर्णयाने वेतनेतर अनुदान दिनांक १ एप्रिल, २००८ रोजीच्या १०० टक्के अनुदानावर असलेल्या शाळांनाच दिले जाते, परंतु सदरहू वेतनेतर अनुदान ५ व्या वेतन आयोगानुसार वेतन अनुदान थांबवून सरसकट ४ टक्के वेतनेतर अनुदान व १ टक्का इमारत भाडे याप्रमाणात दिनांक १ एप्रिल, २००८ पासून न देता दिनांक १ एप्रिल, २०१३ या आर्थिक वर्षापासून देण्यास मान्यता दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ एप्रिल, २००८ नंतर १०० टक्के अनुदानावर असलेल्या शाळांना वेतनेतर अनुदान देण्याबाबत संस्थाकडून व लोकप्रतिनिधींकडून मागणी करण्यात येत असून वेतनेतर अनुदानात सन २०१२-२०१३ पासून कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आली नसून ६ वा व ७ वा वेतन आयोगानुसार कोणतीही सुधारणा करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वेतनेतर अनुदानात दरवर्षी वाढ करण्याबाबत तसेच दिनांक १ एप्रिल, २००८ नंतर १०० टक्के अनुदान आलेल्या शाळांना वेतनेतर अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) राज्यातील कायम विनाअनुदानित खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदानासाठी सन २०२१-२२ करीता शासन निर्णय, दिनांक ०३/०९/२०२१ अन्वये रुपये २६.७५ कोटी तसेच, शासन निर्णय, दिनांक ०२/११/२०२१ अन्वये रुपये ५१.७० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर मेडीकल येथे हॉस्पिटल मॅनेजमेंट इन्फॉमिशन सिस्टीम व्यवस्थापनेच्या माध्यमातून कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या डाटा एन्ट्री ऑपरेटरना कामावर घेण्याबाबत

**(४) ४०२९ (१७-०७-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकरीता सन २००९ मध्ये तसेच नागपूर मेडीकल येथे हॉस्पिटल मॅनेजमेंट इन्फॉमिशन सिस्टीम व्यवस्थापनेच्या माध्यमातून कंत्राटी पध्दतीने ११ वर्षे सेवा दिलेल्या २५ डाटा एन्ट्री ऑपरेटरना कामावरुन कमी केल्याचे दिनांक २१ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामावरुन कमी केल्यामुळे सदर डाटा एन्ट्री ऑपरेटरांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांनी कामावर पुन्हा सामावून घेण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या डाटा एन्ट्री ऑपरेटरांना कामावर घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१७-१२-२०२१) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील १६ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रूग्णालयांमध्ये एचएमआयएस प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर सेवा पुरविण्याकरीता ईआयटी सर्विसेस इंडिया प्रा. लि. या सेवा पुरवठादासोबत करण्यात आलेल्या सेवा करारानुसार उक्त प्रणाली राबविण्यासाठी संबंधित कंपनीने स्वखर्चाने बाह्यस्त्रोताद्वारे/ कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ नियुक्त करून त्यांच्यावर देखरेख, नियंत्रण व वेतन देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित पुरवठादारांची आहे. सेवा पुरवठादाराच्या आस्थापनावरील मनुष्यबळाबाबत केलेली कार्यवाही ही त्या संस्थेची अंतर्गत बाब आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये स्मशानभूमी नसल्याबाबत

**(५) ४२४८ (०९-०९-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २९०५ ला दिनांक २५ जून, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये अंत्यविधीसाठी स्मशानभूमी जागा, शेड, वीज, पाणी व रस्ते आदी सुविधा उपलब्ध नसल्याने अंत्यसंस्काराच्यावेळी अडचणी येत असल्याने वरील सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परभणी जिल्ह्यातील तालुकानिहाय उपलब्ध असलेल्या स्मशानभूमीतील सुविधाबाबत सद्यःस्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अंत्यविधीसाठी लागणाऱ्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत ९ पंचायत समितीमध्ये एकूण ७०६ ग्रामपंचायती असून ८९६ स्मशानभूमी उपलब्ध आहेत. तसेच, स्मशानभूमीसाठी जागा, शेड, वीज, पाणी व रस्ते इ. सारख्या सुविधा पुरेशा प्रमाणात दिल्या आहेत.
(३) सन २०१५ -१६ ते सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात ६८२ ग्रामपंचायतींना सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. उर्वरित ग्रामपंचायतींना सुविधा देण्यासाठी निधी उपलब्धता व शासन निकष यांना अधीन राहून पुढील कार्यवाही शक्य आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर व मुंबई येथे नवीन मध्यवर्ती कारागृह उभारण्याबाबत

**(६) ४६८१ (०९-०९-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील येरवडा मध्यवर्ती कारागृहातील बंदी कैद्यांना ठेवण्याची क्षमता २४०० असताना त्या कारागृहात ५८०० कैदी तसेच मुंबईतील आर्थर रोड येथील मध्यवर्ती कारागृहात देखील क्षमतेपेक्षा अधिक कैदी ठेवण्यात आल्याचे दिनांक ५ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येरवडा (पुणे) व आर्थर रोड (मुंबई) येथील मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांची संख्या कमी करुन क्षमतेच्या प्रमाणात पुरेशी जागा उपलब्ध होण्याचेदृष्टीने अहमदनगर व मुंबई येथे नवीन मध्यवर्ती कारागृहे उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अहमदनगर व मुंबई येथे नवीन मध्यवर्ती कारागृह उभारण्याच्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच दोन्ही मध्यवर्ती कारागृह केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२१-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मार्च, २०२० अखेर येरवडा मध्यवर्ती कारागृहातील अधिकृत बंदीक्षमता ही २४४९ असताना प्रत्यक्षात ५६९३ बंदी बंदीस्त होते. तर मुंबईतील आर्थर रोड कारागृहाची अधिकृत बंदीक्षमता ८०४ इतकी असताना मार्च, २०२० अखेर प्रत्यक्षात २९४१ बंदी बंदीस्त होते.
(२) व (३) अहमदनगर (नारायणडोह) येथे ५०० बंदी क्षमतेचे नवीन कारागृहाचे बांधकामाकरीता ११ एकर जागा प्राप्त झाली असून, नकाशे, आराखडा खर्चाचे अंदाजपत्रक व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ मर्या., वरळी यांच्याकडून प्राप्त करण्याची प्रक्रिया कारागृह विभागाकडून सुरु आहे. तर मुंबई येथे नवीन कारागृह बांधण्याचे प्रस्तावित असून, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या कार्यालयामार्फत मौजे-मंडाळे, ता.कुर्ला येथील न.भू. क्र.०६/०१ पै आणि तुर्भे, ता.कुर्ला येथील न.भू.क्र. १० पै मधील सुधार सेवा या प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या जागेबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महिलांवरील अत्याचारासंदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाने राज्याला दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(७) ४९७७ (१२-११-२०२०) श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महिलांवरील अत्याचाराची दखल घेऊन फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार गुन्हा नोंदवून दोन महिन्यांच्या आत प्रकरणाचा तपास पूर्ण केला जावा तसेच अशा प्रकरणामध्ये निष्काळजीपणा दाखविणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई

करण्यात यावी, असे निर्देश केंद्रीय गृह मंत्रालयाने सर्व राज्यांना दिनांक १० ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास दिले आहेत तसेच, महिलांवरील अत्याचाराबाबतच्या तक्रारीनंतर २४ तासांच्या आत वैद्यकीय चाचणी करणे, महिल्यांच्या अत्याचाराच्या तपास यंत्रणेचे पालन करण्यास पोलीस अयशस्वी झाल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, असेही सदरहू निर्देशात स्पष्टपणे नमूद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलासंदर्भात देशात असलेल्या गुन्ह्यांपैकी ९.२ टक्के गुन्हे राज्यात घडत असल्याचे राष्ट्रीय गुन्हे नोंदणी कार्यालयाच्या वार्षिक अहवालानुसार निदर्शनास आले आहे, तसेच, राज्यात महिलांवरील बलात्कार, हत्या, महिलांना विविध कारणांनी आत्महत्येस प्रवृत्त करणे अशा अनेक गुन्ह्याबाबत राज्य अव्वल असल्याचे एनसीआरबीने दिलेल्या अहवालात निदर्शनास आले आहे, दिनांक १ नोव्हेंबर, २०१९ ते सप्टेंबर, २०२० अखेर महिलांवरील गुन्ह्यांच्या संदर्भात राज्यात अ) बलात्कार व खुन, ब) हुंडाबळी, क) आत्महत्येला प्रवृत्त करणे, ड) अॅसिड हल्ला, इ) नवऱ्याच्या नातेवाईकांकडून क्रौर्याच्या घटना व फ) लग्नाच्या उद्देशाने तसेच जबरदस्तीने पळवून नेण्यात येणे अशा प्रकारचे गुन्हे पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात बलात्काराच्या घटनामध्ये अ) १८ वर्षाखालील, ब) १८ ते ३० वयोगटातील, क) ३० ते ४५ वयोगटातील, ड) ४५ ते ६० वयोगटातील व इ) ६० वर्षाहून अधिक वयोगटातील किती महिला आहेत व त्यापैकी बलात्कारानंतर किती महिलांचे बळी झालेत, गेल्या सहा महिन्यात महिला विरोधी गुन्हे संबंधित किती खटले प्रलंबित आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने केंद्रीय गृह मंत्रालयाने राज्याला दिलेल्या निर्देशाची अंमलबजावणी करून संबंधित गुन्हेगार तसेच अशाप्रकरणामध्ये निष्काळजीपणा दाखविणाऱ्या बेजबाबदार अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) केंद्रीय गृह मंत्रालय (महिला सुरक्षा विभाग) यांचेकडून दिनांक ०९/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये निर्देश प्राप्त झाले आहेत.

त्यानुषंगाने राज्यातील सर्व पोलीस घटकांना सदर निर्देशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून दिनांक १८/११/२०२० रोजीच्या पत्रकाद्वारे सर्व पोलीस घटकांना कळविण्यात आले आहे.

(२) एनसीआरबी अहवाल २०१९ नुसार देशात महिला अत्याचारासंदर्भात एकूण ४,०५,८६१ गुन्हे दाखल असून त्यापैकी महाराष्ट्र राज्यात ३७,१४४ गुन्हे दाखल आहेत. एनसीआरबी अहवाल २०१९ नुसार राज्यात महिलांवरील बलात्काराचे २२९९ गुन्हे दाखल असून, राज्याचा प्रति लाख लोकसंख्येमागे गुन्हेगारीचा दर ३.९ असून, देशात हा दर ४.९ आहे.

महाराष्ट्र राज्यात नोव्हेंबर, २०१९ ते सप्टेंबर, २०२० या कालावधीत अ) बलात्कार व खुन-१६, ब) हुंडाबळी-१५४, क) आत्महत्येला प्रवृत्त करणे-६२९, ड) ॲसिड हल्ला-७, इ) नवऱ्याच्या नातेवाईकांकडून क्रौर्याच्या घटना-५३४३ व फ) लग्नाच्या उद्देशाने तसेच जबरदस्तीने पळवून नेण्यात येणे-३५० असे गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

(३) सन २०२० मध्ये राज्यातील बलात्काराच्या घटनांचा तपशील-

| अ.क्र. | वयोगट (महिला व मुली) | संख्या |
|---|---|---|
| १ | १८ वर्षाखालील | २८०० |
| २ | १८ ते ३० | १४२० |
| ३ | ३० ते ४५ | ५७७ |
| ४ | ४५ ते ६० | ६१ |
| ५ | ६० वर्षाहून अधिक | ७ |

राज्यात जानेवारी, २०२१ ते ऑक्टोबर, २०२१ या कालावधीत भा.द.वि. आणि विशेष व स्थानिक कायद्यांतर्गत महिला व बाल अत्याचाराबाबतच्या एकूण ३०५२५ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. या कालावधीत बलात्कारासह खुनाच्या एकूण ११ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

(४) केंद्रीय गृह मंत्रालयाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत व महिला अत्याचाराचे गुन्ह्यात निष्काळजीपणा करणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांवर नियमाप्रमाणे कारवाई करण्याबाबत राज्यातील सर्व पोलीस घटकांना विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून दिनांक १८/११/२०२० रोजीच्या पत्रान्वये सूचीत करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमधील (महावितरण) मधील उपकेंद्र सहाय्यक पदाच्या भरती प्रक्रियेला स्थगिती दिल्याबाबत

**(८) ५०२७ (२३-११-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण उपकेंद्र सहाय्यक पदाच्या भरती प्रक्रियेची माहे मे, २०१९ ला जाहिरात काढून माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये ऑनलाईन परीक्षा प्रक्रिया पूर्ण केली व दहा महिन्यानंतर दिनांक २८ जून, २०२० रोजी या परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १६ व १७ जुलै, २०२० रोजी कागद पडताळणीची तारीख जाहीर झाली परंतु कोरोनाचे कारण देत ती तारीख रद्द करुन दिनांक १५ सप्टेंबर, २०२० ची तारीख देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १५ सप्टेंबर, २०२० रोजी कागद पडताळणीसाठी मेडीकल सर्टिफिकेट देखील काढण्यास सांगितले होते परंतु दिनांक १४ सप्टेंबर, २०२० ला कोणतेही स्पष्ट कारण न देता दिनांक १५ सप्टेंबर, २०२० रोजी कागद पडताळणी होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, निवड झालेल्या उमेदवारांनी अनेक वेळा महावितरणकडे यासंदर्भात पाठपुरावा करूनही समाधानकारक उत्तर मिळत नसून भरती होणार की रद्द होणार या चिंतेत हजारो बेरोजगार तरुण भरती प्रक्रियेच्या दीड वर्षापासून प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महावितरण मधील २३०० उपकेंद्र सहाय्यक पदाची भरती प्रक्रिया तात्काळ राबविण्याबाबत व लाभार्थ्यांची यादी जाहीर करण्याबाबत सध्या प्रशासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२९-११-२०२१) :** (१) जाहिरात क्र. ५/२०१९ अन्वये कंत्राटी पध्दतीवर उपकेंद्र सहाय्यक पदे भरण्याकरीता माहे जुलै-२०१९ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन सदर पदाकरीता ऑनलाईन क्षमता चाचणी दिनांक २५/०८/२०१९ रोजी घेण्यात आली. तद्नंतर या पदाची निवड यादी माहे जून/ऑगस्ट २०२० मध्ये प्रसिध्द करण्यात आली.
(२) होय. हे खरे आहे.
(३) मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल झालेल्या विशेष अनुमती याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर संलग्न याचिका संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या (एस.ई.बी.सी.) आरक्षणा संदर्भात दिनांक ९/०९/२०२० रोजी पारित केलेल्या आदेशास अनुसरुन दिनांक १५ सप्टेंबर, २०२० रोजी आयोजित केलेली कागदपत्र पडताळणी रद्द करण्यात आली.
(४) व (५) मा.उच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिका क्र.५१९६/२०२१ व इतर याचिकांमध्ये दिलेले आदेश विचारात घेऊन सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (एस.ई.बी.सी.) व आर्थिकदृष्या दुर्बल घटक (ई.डब्लु.एस.) वगळता इतर पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेतील अनियमितता व गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत

**(९) ५१४३ (२३-११-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.नरेंद्र दराडे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विलास पोतनीस, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (मुंबई बँक) मधील विविध अनियमितता व गैरप्रकाराबाबत असंख्य तक्रारी प्राप्त झाल्यामुळे चौकशी करण्याबाबतचे आदेश सहकार आयुक्त, पुणे यांनी माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान जारी केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई बँकेतील ४८ कोटी रुपयांचा तोटा आणि या गैरव्यवहाराची त्रिसदस्यीय समिती नेमून चौकशी करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सदर चौकशी पूर्ण करुन चौकशी समितीचा अहवाल शासनास किती कालावधीत येणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२९-११-२०२१) :** (१) सहकार आयुक्त व निबंधक यांच्या दिनांक १८/०९/२०२० च्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ ए खाली तपासणीचे आदेश निर्गमित केले आहेत.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ ए खालील तपासणी संदर्भात तपासणी अधिकारी यांनी दिनांक १४/०१/२०२१ रोजी तपासणी अहवाल सादर केला आहे.

(३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ ए खालील तपासणी अहवालाच्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांनी त्यांचेकडील दिनांक १६/०२/२०२१ रोजीच्या आदेशान्वये कलम ८१(३)(क) खाली चाचणी लेखापरिक्षणाचे आदेश निर्गमित केले आहे.

तपासणी अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक १०/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये चाचणी लेखापरिक्षण अहवाल सादर केलेला आहे. तसेच दिनांक २०/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रशासकीय विशेष अहवाल सादर केलेला आहे. सदर चाचणी लेखापरिक्षण अहवाल व प्रशासकीय विशेष अहवालाच्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांनी त्यांचेकडील दिनांक २२/०९/२०२१ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ खालील चौकशीचे आदेश निर्गमित केले आहेत. चौकशी अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक, २ पुर्व उपनगरे, मुंबई यांची नियुक्ती केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद येथील शासकीय कॅथलॅब यंत्र बंद असल्याबाबत

**(१०) ५२७१ (२३-११-२०२०) श्री.अंबादास दानवे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यासह औरंगाबाद जिल्ह्यात सन २००७ पासून हृदयरोग रुग्णांसाठी अँजिओग्राफी आणि अँजिओप्लास्टीची व्यवस्था फक्त औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातच (घाटी) उपलब्ध आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही सुविधा सीव्हीटीएस विभागाचे कॅथलॅब नादुरुस्त आणि कालबाहय झाल्याने मागील दिड वर्षांपासून बंद असल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयातील सुपरस्पेशालिटी रुममध्ये नवीन कॅथलॅब यंत्र येवून एक वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही सदर यंत्राचा वापर करुन बंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने हृदयरोग रुग्णांची गैरसोय दुर करण्याबाबत व कॅथलॅब यंत्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२९-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) कॅथलॅब हे यंत्र संस्थेस प्राप्त झालेले असून संबंधित पुरवठादारामार्फत प्रस्थापित करण्यात आले आहे. सध्या सदर रुग्णालय हे कोविड रुग्णालय म्हणून घोषित असून सदर इमारत रुग्णालयास हस्तांतरणाची तांत्रिक बाब पूर्ण होताच सदर यंत्र रुग्णसेवेसाठी पूर्ण क्षमतेने उपलब्ध करुन देण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कृषी मालासाठी गोदामे उभारण्याबाबत

**(११) ५८५३ (१८-११-२०२०) श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अतिवृष्टीमुळे व अन्य कारणांमुळे शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेल्या शेत मालांचे दरवर्षी नुकसान होत असल्याने राज्यातील प्रत्येक गावामध्ये कृषी मालासाठी गोदामे उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील प्रत्येक गावामध्ये कृषी गोदामे उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२९-११-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही. शेतकरी, व्यापारी, शासकीय संस्था, कंपन्या यांना माल साठवणूकीची सुविधा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ कार्यरत आहे. माल साठवणूकीची सुविधा देण्यानुषंगाने स्वत:च्या मालकीच्या जागेवर व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारामध्ये मोठ्या क्षमतेच्या गोदामांची उभारणी वखार महामंडळाकडून स्वनिधीतून केली जाते. या महामंडळाची राज्यात १९७ ठिकाणी ९४१ स्वमालकीची गोदामे असून एकूण स्वमालकीच्या गोदामांची साठवणूक क्षमता १६.३७ लाख मे.टन आहे. वखार महामंडळाकडून

शेतकऱ्यांसाठी शेतमाल तारण कर्ज योजना राबविली जाते. त्याचबरोबर तालुक्याच्या आजूबाजूच्या परिसरातील शेतकऱ्यांना शेतमाल खरेदी विक्रीसाठी तालुकास्तरावर कृषी उत्पन्न बाजार समित्या कार्यरत असून बाजार समित्यांचीही स्वमालकीची गोदामे आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महापारेषणकंपनी मधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) ६१८१ (१४-१२-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऊर्जा विभागाच्या महापारेषण या वीज कंपनीत तांत्रिक श्रेणीतील ८५०० रिक्त पदे भरण्याचे आदेश राज्याचे ऊर्जा मंत्री यांनी दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही भरती प्रक्रिया केव्हापासून सुरू होणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू भरती प्रक्रियेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२९-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महापारेषण कंपनीतील तांत्रिक श्रेणीतील रिक्त पदे नियमानुसार भरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(२) महापारेषण कंपनीने त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रमांक ३, दिनांक १५/०६/२०२१ अन्वये तांत्रिक पदांचा सुधारित कर्मचारी मानांक लागू केला आहे. सदर सुधारित कर्मचारी मानांकानुसार कंपनीने आजपर्यंत वेतनगट-१ व ३ मधील १४१७ पदे पदोन्नतीद्वारे भरली आहेत. उर्वरित ५०२१ पदे रिक्त असून ही पदे अंतर्गत अधिसूचना (४४३), सरळसेवा भरती (३३४०) व पदोन्नती (१२३८) या विहित भरती माध्यमाद्वारे भरावयाची आहे. सदर पदे भरण्याबाबत महापारेषण कंपनीकडून नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

# काल्हेर (ता.भिवंडी, जि.ठाणे) गावातील राजकीय पक्षाच्या शाखाप्रमुखावर झालेल्या हल्ल्याबाबत

**(१३) ६६८८ (१६-०३-२०२१) श्री.महादेव जानकर, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काल्हेर (ता.भिवंडी, जि.ठाणे) गावातील एका राजकीय पक्षाचे शाखाप्रमुख दिपक म्हात्रे यांच्यावर दिनांक ३ जानेवारी, २०२१ रोजी दुचाकीवरुन आलेल्या दोघांची रिव्हॉल्व्हरने तीन वेळा गोळीबार केल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) होय.

(२) व (३) दिनांक १५/०१/२०२१ रोजी होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकीकरीता आधारवाडी कारागृहामध्ये न्यायालयीन बंदी असलेले आरोपी सुजित ऊर्फ तात्या पाटील यांची पत्नी श्रीम. भावना सुजित पाटील, भाजपा पुरस्कृत उमेदवार यांच्या विरोधात शिवसेना पुरस्कृत उमेदवार श्री.उमाकांत रघुनाथ पाटील हे उभे होते. श्रीम. भावना पाटील यांना बिनविरोध निवडून देण्याकरीता आरोपी सुजित पाटील व तेजस पाटील हे श्री.उमाकांत रघुनाथ पाटील यांना जबरदस्ती करीत होते. परंतु शिवसेना शाखाप्रमुख श्री.दीपक म्हात्रे यांच्यामुळे सदरची जागा बिनविरोध होत नाही, असा समज झाल्याने त्याचा मनात राग धरून, कट रचून श्री.दीपक म्हात्रे व त्यांचे पत्नीवर देशी बनावटीचे पिस्तूल यांमधून ३ फायर करून त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी नारपोली पोलीस स्टेशन, भिवंडी येथे गु.र. क्र. ६/२१, भा.स.वि. ३०७, ३४ सह आर्म ॲक्ट कलम ३, २५, २७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या ५ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्हा न्याय प्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई पोलीस दलातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१४) ८४७५ (१४-०६-२०२१) श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलीस दलात पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक यांचे मंजूर ४०,४७० पदांपैकी ६,७३७ पदे, पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस आयुक्त दर्जाच्या मंजूर ५,५९० पदांपैकी १,७०६ पदे रिक्त असल्याचे दिनांक ५ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईची लोकसंख्या, नागरिकांची जगण्याची पध्दत, गुन्हे यामुळे राज्यातील इतर शहराच्या तुलनेत मुंबईत मनुष्यबळ अधिक लागत असल्याने मुंबई पोलीस दलातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२०-१२-२०२१)** : (१) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची एकूण ४५३७७ पदे मंजूर असून त्यापैकी ३५७१३ पदे कार्यरत व ९६६४ पदे रिक्त आहेत. तसेच पोलीस उप निरीक्षक ते पोलीस आयुक्त संवर्गाची एकूण ५८८२ पदे मंजूर असून त्यापैकी ४४४७ पदे कार्यरत व १४३५ पदे रिक्त आहेत.
(२) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवरील अधिकाऱ्यांची पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच पोलीस भरती-२०१९ अंतर्गत बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलीस शिपाई संवर्गाची १०७६ पदे व पोलीस शिपाई चालक संवर्गाची १५६ पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात शाळाबाह्य आढळलेली मुले शिक्षणापासून वंचित राहू नये याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(१५) ८४८३ (२०-०७-२०२१) श्री.जयंत पाटील, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किशोर दराडे, श्री.अरुण लाड, श्री.विनायकराव मेटे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी राज्यव्यापी शोध मोहीम दिनांक १ ते १० मार्च या कालावधीत राबविली असून सदरहू शोधमोहिमेतून ६ ते १४ वयोगटातील २५ हजार २०४ विद्यार्थी शाळाबाह्य असल्याचे संकलित केलेल्या माहितीतून स्पष्ट झाले असून सदर मुलांमध्ये २८८ बालकामगार, १२१२ विशेष गरजा असलेली मुले, तर २३ हजार ७०४ मुले अन्य कारणामुळे शाळा बाह्य झाल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे त्यापैकी ७ हजार ८०६ मुले कधीच शाळेत गेलेली नाहीत तसेच १७ हजार ३९७ मुले अनियमित उपस्थितीमुळे शाळाबाहय झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात शाळाबाह्य म्हणून आढळलेल्या मुलांमध्ये नाशिक, पालघर, मुंबई, वर्धा, यवतमाळ, नांदेड आदी जिल्ह्यांमध्ये बालकामगार असल्याचे स्पष्ट झाले असून ३ जिल्हे, २ महानगरपालिका क्षेत्रात सदरची मोहीम राबविण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, कोरोना कालावधीत इयत्ता पहिली ते बारावीच्या प्रत्यक्ष शाळेत न गेलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ७४ लाख ३० हजार १८४ असताना शासनाच्या शोध मोहिमेत केवळ २५ हजार विद्यार्थी शाळाबाहय असल्याचे निदर्शनास आले, तर कोरोनामुळे मुंबईतील सुमारे १० हजार मुले शाळाबाहय झाल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मुंबई महानगरपालिका आणि मुंबई शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून करण्यात आलेल्या सर्वेक्षणातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळाबाहय मुले शिक्षणापासून वंचित राहू नये याकरीता निश्चित कालावधीचा कार्यक्रम ठरवून शाळाबाहय मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून शाळाबाह्य मुलांचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी तसेच सदरहू जिल्ह्यात आणि महापालिकेत उर्वरित मोहीम राबवून मुलांची माहिती काढण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे.

औरंगाबाद व नागपूर असे दोन मनपा व औरंगाबाद जिल्ह्यामध्ये सर्व्हेक्षण केलेले नाही.
(३) अंशतः खरे आहे.
(४) शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची कार्यवाही सूरु आहे.

तसेच राहिलेल्या जिल्ह्यात सर्व्हेक्षण करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शैक्षणिक खाजगी स्कूल व्हॅन, बस व्यावसायिकांना आर्थिक मदत करण्याबाबत

**(१६) ८४८७ (२०-०७-२०२१) श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरातील शाळा व महाविद्यालये लॉकडाऊनमुळे मागील १४ महिन्यांपासून बंद असल्याने खाजगी स्कूल व्हॅन, बस व्यावसायिकांची अवस्था अतिशय दयनीय झाल्याने सुमारे एक लाखांहून अधिक चालक-मालकांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकीकडे कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न आणि दुसरीकडे गाड्यांचे हफ्ते फेडता न आल्याने कर्जाला कंटाळून आतापर्यंत सहा जणांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाजगी स्कूल व्हॅन, बस व्यावसायिकांच्या खात्यात दरमहा ठराविक रक्कम जमा करून त्यांना आर्थिक मदत करण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१०-१२-२०२१) :** (१), (२), (३) व (४) "१४ महिन्यांपासून थांबले स्कूल बसचे धावणारे चाक" अशा आशयाची बातमी दिनांक २०/५/२०२१ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली आहे. विविध स्कूल बस चालक मालक संघटनांकडून कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या काळात राज्यातील शाळा व महाविद्यालये बंद असल्याने स्कूल व्हॅन, बस व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ आली असल्याबाबतची निवेदने प्राप्त झालेली आहेत. तसेच स्कूलबस म्हणून वापरात येणाऱ्या वाहनांना मोटार वाहन करातून काही कालावधीकरीता सुट देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## राज्यात शुल्क नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१७) ८६१९ (२०-०७-२०२१) डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.रमेश कराड : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक ४८०५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खाजगी शाळांतील शुल्क ठरविण्यासाठी राज्यात शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ व महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शुल्क विनियमन नियम, २०१६, तसेच महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०१८ तयार केले असून यात सुसंगता नसल्याने शुल्क आकारणीत गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शुल्क विषयक कायदे, नियम यात सुसूत्रता आणणे, शाळा व्यवस्थापनाच्या मनमानी कारभारावर नियंत्रण ठेवणे, पालकांच्या तक्रारीचे निराकरण करणे, व्ही.जी.पळशीकर समितीने शासनाला दिलेल्या अहवालातील शिफारशींचा अभ्यास करुन सुधारणा सुचविणे, न्यायालयीन निर्णय इत्यादीचा अभ्यास करुन सुसूत्रता ठरविण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी सुयोग्य धोरण आखण्यासाठी शासनास शिफारशी करण्यासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत दहा सदस्यांची समिती माहे मार्च, २०२१ च्या पहिल्या आठवड्याच्या सुमारास नेमण्यात आली, उक्त समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, राज्यात कोरोना काळात शाळा बंद तसेच ऑनलाईन वर्ग सुरु असताना खाजगी शाळांसह, विद्यापीठ महाविद्यालयामार्फत विद्यार्थी महाविद्यालयात शिक्षणासाठी जात नसतानाही लायब्ररी शुल्क, मेंटेनन्स शुल्क, गणवेश शुल्क, प्रॅक्टिकल शुल्क घेत असल्याचे तसेच अनेक शैक्षणिक संस्थांनी पालकांना पुढील शैक्षणिक वर्षाचे संपूर्ण शुल्क जूनच्या आत भरण्याबाबत सक्ती केल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले असून डिस्टन्स एज्युकेशनप्रमाणे कॉम्प्युटर तथा ऑनलाईन ट्युशन विद्यार्थ्यांना दिले जात असताना अनावश्यक आगाऊ शुल्क घेतल्याची लेखी तक्रार लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे विद्यापीठास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव आणि टाळेबंदीमुळे शाळा बंद असून पालकवर्ग आर्थिक संकटात सापडल्याने नव्या शैक्षणिक वर्षातही शुल्क कपात करण्याची मागणी पालकवर्गाने केल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून शुल्ककपात करण्यावरुन पालक आणि शाळा व्यवस्थापनेत वाद होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, राजस्थान सरकारने आपत्ती व्यवस्थापन अधिनियमांतर्गत निर्गमित केलेल्या आदेशाच्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला असून इंग्रजी माध्यमाच्या शाळा व्यवस्थापनाकडून विद्यार्थ्यांच्या पालकांकडून नियमबाह्य शुल्क वसूल करण्यात येत असल्याची तक्रार पालकांकडून तसेच नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक १३/०९/२०२०, ०६/०५/२०२१ व त्यापूर्वीही अनेकवेळा दिली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाने सन २०१४ मध्ये शुल्क नियंत्रण कायदा करून माहे डिसेंबर, २०१४ पासून विभाग स्तरावर स्थापन केलेल्या शुल्क नियंत्रण समितीला अद्यापपर्यंत अध्यक्षच मिळाला नसल्याने शासनाचा उद्देश व धोरण अमलात येवू शकले नाही, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच शुल्क नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी करण्याकरीता शासन केव्हा आदेश निर्गमित करणार आहे ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) नाही.

(२) होय, समितीचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.

(३) अशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) होय.

(६) शासन अधिसुचना दिनांक ०७/०६/२०२१ अन्वये विभागीय शुल्क नियामक समित्यांचे गठन करण्यात आले आहे.

---

## जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मीची) औरंगाबाद या संस्थेची पुनर्रचना करुन व्यवस्थापन जलसंपदा विभागाकडे देण्याबाबत

**(१८) ८६६१ (१५-०७-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मीची) औरंगाबाद या संस्थेची पुनर्रचना करुन वाल्मीचे व्यवस्थापन पुर्ववत जलसंपदा विभागाकडे देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२९-१०-२०२१) :** (१) होय.

(२) वाल्मी (जल व भूमी व्यवस्थापन संस्था) औरंगाबाद ही संस्था पूर्वीप्रमाणेच जलसंपदा विभागाकडे जोडणेबाबत मा.मंत्री (जलसंपदा) व मा.मंत्री (मृद व जलसंधारण) यांचेस्तरावर बैठकीचे आयोजन करण्यासंदर्भात कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## म्हैसमाळ (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) गावाजवळ गिरजादेवी साठवण तलाव योजना मंजूर करुन देण्याबाबत

**(१९) ८६६३ (२०-०७-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हैसमाळ (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) गावाजवळ गिरजादेवी साठवण तलाव योजना मंजूर करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पर्यटन मंत्र्याकडे पत्राद्‌वारे माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पत्राच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (२१-१२-२०२१) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) म्हैसमाळ, वेरुळ, सुलीभंजग ता.खुलताबाद पर्यटन विकास आराखड्या अंतर्गत साठवण तलाव गिरिजादेवी, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद या योजनेच्या सर्वेक्षण कामाच्या अंदाजपत्रकास शासन निर्णय दिनांक ११/०८/२०२१ अन्वये रुपये २६.४१९ लक्ष रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाड्यासाठी गोदावरी खोऱ्यातील पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२०) ८६६७ (१५-०७-२०२१) श्री.अंबादास दानवे : तारांकित प्रश्न क्रमांक ६६०८ ला दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यासाठी गोदावरी खोऱ्यातील पाणी उपलब्ध करुन देण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(२) असल्यास, तत्संदर्भातील योजनांमध्ये भूसंपादनाच्या येणाऱ्या अडचणी दूर करण्यात आल्या आहेत काय,

(३) तसेच, उर्वरित ५ योजनांना मान्यता देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१६-१२-२०२१) :** (१) शासन निर्णय दिनांक १९/०९/२०१९ अन्वये दुष्काळग्रस्त मराठवाड्यासाठी व गिरणा उपखोऱ्यासाठी कोकणामधून पाणी वळविण्यासाठीच्या योजनांना तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये आंतरराज्यीय दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प व राज्यांतर्गत नार-पार-गिरणा,पार-गोदावरी, दमणगंगा- वैतरणा- गोदावरी व दमणगंगा-एकदरे-गोदावरी इ. नदीजोड प्रकल्प राज्यांतर्गत प्रकल्प म्हणून राबविण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच उल्हास, वैतरणा, नार-पार व दमणगंगा उपखोऱ्यातून प्रस्तावित गोदावरी खोरे (२९ योजना, १६८ अघफू पाणी वापर) व गिरणा उपखोरे वळण योजना यांचे सविस्तर सर्वेक्षण/अन्वेषणाचे उर्वरीत काम हाती घेण्यात यावे, त्यांचे प्राथमिक अन्वेषण अहवाल, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून त्यांची व्यवहार्यता तपासून पुढील मंजूरीसाठी शासनास सादर करावेत, असे सदरील शासन निर्णयात नमुद आहे.

निर्णय दिनांक २९/०६/२०२० नुसार पश्चिम वाहिनी नदी खोऱ्यांतून (कोकण) अतिरिक्त पाणी मराठवाड्यात व गिरणा (तापी) उपखोऱ्यात वळविण्यासाठी, एकात्मिक राज्य जल आराखड्यात प्रस्तावित योजनांबाबत प्राथमिक अभ्यास करणे, मार्गदर्शन करणे व सनियंत्रण करणे इ. साठी

कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीचे काम प्रगतीत आहे.

गोदावरी खोऱ्यात पाणी वळविणेसाठी एकूण ३० प्रवाही वळण योजना प्रस्तावित आहेत. त्यापैकी १४ प्रवाही वळण योजना पूर्ण होवून पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणलोट क्षेत्रातून १.०७ अ.घ.फु. पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यात आले आहे. अन्य ५ प्रवाही वळण योजना बांधकामाधीन असून ११ प्रवाही वळण योजना भविष्यकालीन आहेत. याद्वारे ६.३३ अ.घ.फू. पाणी वळविण्यात येईल.

गोदावरी खोऱ्यात पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी दमणगंगा-एकदरे-गोदावरी (वाघाड धरण) व दमणगंगा-वैतरणा-गोदावरी या नदीजोड योजनाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम राष्ट्रीय जलविकास अभिकरण (NWDA) यांच्या कडून प्रगतीत आहेत.

पार-गोदावरी उपसा जोड योजना क्र-३ व ४ या योजनेची अंदाजपत्रके महामंडळाचे पत्र दिनांक ३०/०७/२०२१ अन्वये मुल्यार्पणास्तव राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांना सादर करण्यात आलेले आहेत. तद्नंतर म.ज.नि.प्रा. अधिनियम २००५ मधील कलम ११ (च) अंतर्गत मान्यतेस्तव सादर करण्यात येतील. उपरोक्त दोन्ही मान्यता प्राप्त झालेनंतर सदर योजनेस राज्याच्या आर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपाल महोदयांचे निदेश यानुसार प्रशासकीय मान्यता देणे शक्य होईल.

(२) ०२ नदीजोड योजनांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झालेला नाही. सबब अद्याप भुसंपादन कार्यवाही प्रगतीत नाही.

तसेच ०५ प्रवाही वळण योजना बांधकामाधीन आहेत. (गोळशी महाजे, ननाशी, धोंडळपाडा, पायरपाडा, व वैतरणा वळण योजना) यापैकी ०४ प्रवाही वळण योजनांची भूसंपादनाची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे. व वैतरणा वळण योजनेस भूसंपादनाची अडचण नाही.

१. गोळशी महाजे- प्रकल्पासाठी आवश्यक एकूण ३६.६२ हे. पैकी ३३.८९ हे. भूसंपादन पूर्ण झाले असून उर्वरीत २.७३ हे.प्रगतीपथावर आहे.

२. ननाशी वळण योजना-

अ. खाजगी जमिन-२३.०६२ हे. खाजगी जमिनीपैकी ९.५१ हे. सरळ खरेदी पध्दतीने संपादीत झाले. उर्वरीत १६ गट (क्षेत्र १०.६०२ हे) प्रगतीपथावर.

आ. वनजमीन-सद्य:स्थित वनजमीनाचा प्रस्ताव मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र दिनांक २२/११/२०२१ रोजी मा.प्रधान सचिव (वनविभाग), महसुल व वनविभाग, मंत्रालय, मंबई यांना सादर.

३. धोंडाळपाडा वळण योजना-

अ. खाजगी जमिन-३१.८४ हे. खाजगी जमिनीपैकी २५.५१ हे. संपादीत झाले असून ६.३३ हे.खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी करण्याचे प्रगतीपथावर आहे.

आ. वनजमीन-भुसंपादन पूर्ण झाले आहे.

४. पायरपाडा वळण योजना-

खाजगी जमिन-३७.०८ हे. आवश्यक असून खाजगी जमीन मालकांचा भूसंपादनास विरोध असल्याने भुसंपादन करण्यास विलंब झाला. सद्यस्थित भुदारकांची समजुत काढण्यात आलेली असून भुमी अभिलेख कार्यालय, दिंडोरी यांच्यासोबत संयुक्ती मोजणी प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्नामधील उर्वरीत ५ योजनांची नावे नमूद नसल्याने कोणत्या ५ योजना याचा बोध होत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.